# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. १२/१२/२०१८

## मौजे थेऊर ता. हवेली जिल्हा पुणे येथील मंडल अधिकाऱ्यासह खाजगी इसमास पंधरा हजार रूपयांची लाच स्विकारताना रंगेहात पकडले.

---

यातील तक्रारदार यांच्या वडीलोपार्जीत जमिनीबाबतच्या नोंदी मंजूर करण्यासाठी मंडल अधिकारी थेऊर येथील कार्यालयात अर्ज केला होता. त्याप्रमाणे तक्रारदार व त्यांच्या पत्नीचे नावे वडिलोपार्जीत प्राप्त जमिनीच्या नोंदी मंजूर करून त्या ७/१२ उताऱ्यावर घेण्यासाठी थेऊर येथील मंडल अधिकारी चंद्रशेखर दगडे याने तक्रारदार यांच्याकडे पंधरा हजार रूपयांची लाचेची मागणी केली होती. सदर बाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयामध्ये तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीची दिनांक ११/१२/२०१८ रोजी पडताळणी केली असता लोकसेवक चंद्रशेखर दगडे, मंडल अधिकारी याने तक्रारदार व त्यांच्या पत्नीचे नावे वडिलोपार्जीत प्राप्त जमिनीच्या नोंदी मंजूर करून त्या ७/१२ उताऱ्यावर घेण्यासाठी पंधरा हजार रूपयांची लाचेची मागणी केली.

त्यावरुन आज दिनांक १२/१२/२०१८ रोजी सापळा कारवाई केली असता सापळा कारवाईमध्ये लोकसेवक चंद्रशेखर जगन्नाथ दगडे, वय - ५०, मंडल अधिकारी, मौजे थेऊर ता. हवेली जिल्हा पुणे याने तक्रारदार यांचेकडून १५,०००/- रूपयांची लाचेची रक्कम थेऊर येथील कार्यालयात खाजगी इसम अशोक तात्याबा वाघमारे, वय ३४, खाजगी इसम रा. ऊरूळीकांचन याचेकरवी स्विकारल्यावर त्या दोघांना रंगेहात पकडण्यात आले असुन त्यांचेवर लोणीकाळभोर पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई हि मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. संदीप दिवाण यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याबाबतचे आवाहन श्री. संदीप दिवाण, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. फेसबुकपेज - **www.facebook.com-maharashtraACB**
७. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**

( सुहास नाडगौडा )
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.